# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** शिक्रापुर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0273 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 01/04/2026 16:56

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिंनाक पासून):** 06/01/2026
   **Date To ( दिंनाक पर्यंत):** 06/01/2026
   **Time From (वेळेपासून):** 12:19 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 13:09 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 01/04/2026 **Time (वेळ):** 16:39 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 025
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 01/04/2026 16:39 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 12 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कान्हूर मेसाई शाळेच्या गेट जवळ,ता शिरुर जि पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सतिश संभाजी वाळके सहायक पोलीस आयुक्त पोलीस उपअधीक्षक

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1972

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन क्र.)

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे ,शिक्रापुर ,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे ,शिक्रापुर ,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8087002020

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. भरत पोपट गायकवाड | | | 1. रा कान्हुरमेसाई ता शिरूर, शिक्रापुर ,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी सतिश संभाजी वाळके, वय-54, व्यवसाय- नोकरी, पद- सहायक पोलीस आयुक्त / पोलीस उपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे मो नं 8087002020
मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग पुणे येथे सहायक पोलीस आयुक्त / पोलीस उपअधीक्षक या पदावर दिंनाक 21/06/2025 रोजी पासून कार्यरत आहे. दिंनाक 09/12/2025 रोजी 14.30 वा मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे येथे कर्तव्यावर हजर असतांना आमचे प्रशासन अधिकारी श्री. दयानंद गावडे, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी तक्रारदार श्री.चंद्रकांत अप्पाजी शिंदे, वय- 40 वर्षे, व्यवसाय- शेती, रा. कान्हुरमेसाई, ता. शिरुर, जि. पुणे, मो.नं. 9823631512 यांची लाच मागणीबाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले. श्री. दयानंद गावडे, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी तात्काळ आम्हाला सदर कारवाई करीता आरोग्य विभागाचे◌ पंच उपलब्ध करुन देत असलेबाबत सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांना आम्ही आमचे कक्षात सोबत घेवून आलो.
थोडयाच वेळात आरोग्य विभागाचे श्री अनिकेत बाळासाहेब पवार, वय 27 वर्षे, पद- कनिष्ठ लिपीक, नेमणुक- सह संचालक  आरोग्य सेवा, पुणे, पत्ता- जिल्हा रूग्णालय औध, औंध हॉस्पीटल कॉटर टायप 2 बिल्डींग, डिफेंस एरिया, सांगवी फाटा पुणे- 411027, व श्री अनुप प्रताप जेधे, वय – 41 वर्षे, पद- शुश्रुषा ऑर्डली, नेमणुक- सह संचालक  आरोग्य सेवा, पुणे, पत्ता- अझाद नगर, सर्वे न. 57 फॉट नं.29, वानवडी पुणे-411040 जि. पुणे, हे लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे येथे हजर झाले.
त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांची व तक्रारदार यांची ओळख करून दिली तसेच पडताळणी कारवाईतील अंमलदार पो. शि./1966 /प्रविण तावरे, पो.कॉ./3037/विशाल माने व मपोकॉ/10736 पुजा डेरे यांची देखील ओळख करुन दिली. अशा प्रकारे पडताळणी कारवाईत सहभागी होणा-या, तक्रारदार, पोलीस अधिकारी, अंमलदार व पंचाची ओळख झाली.
त्यानंतर नमुद पंच यांना तक्रारदार श्री. चंद्रकांत अप्पाजी शिंदे यांची लोकसेवकाविरुध्द तक्रार असुन आपण सदर कारवाई करीता पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात का? असे विचारले असता दोन्ही पंचानी कारवाई करीता पंच म्हणुन काम करण्यास होकार दिला. त्यानंतर नमुद कारवाई करीता पंच क्रं 1 म्हणुन श्री अनिकेत बाळासाहेब पवार,हे काम पहातील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार चंद्रकांत शिंदे यांना आम्ही दोन्ही पंचासमक्ष त्यांची तक्रार कथन करण्यास सांगीतली त्यांनी ती कथन केली व त्यानंतर नमुद तक्रार तक्रारदार यांनी त्यांचे हस्ताक्षरामध्ये पंचांसमक्ष लिहुन दिली ती खालीलप्रमाणे.
" मी वरीलप्रमाणे असुन मौजे कान्हुरमेसाई गावठाण सिटी सव्हे नं. 96 हा माझे मालकी व वहिवाटीचा असून सदर सिटी सव्हे नं.96 मध्ये अनाधिकृत अतिक्रमण करून बेकायदेशीर बांधकाम करून सदरची नोंद ही 8अ उतारा ग्रा. पं. मालमत्ता क्र.11-015-264 ला बेकायदेशीरपणे लावलेली असून सदरची नोंद ही बेकायदेशीर असून प्रत्यक्षात रामदास केरू लांगे व शोभा रामदास लांगे यांनी बेकायदेशीर नोंद केली असून सदरची नोंद हि 7/12,8अ, मालकी हक्क, मोजणी नकाशा व इतर कायदेशीर कागदपत्रे न पाहता संबंधित ग्रामसेवक अधिकारी यांनी अ. क्र.304 ला गावठाण मालमत्ता क्र. 11-015-264 शासकीय अशी नोंद केलेली आहे. तरी त्याबाबत संबंधित रामदास केरू लांगे व शोभा रामदास लांगे यांची नोंद 8अ ला बेकायदेशीर नोंद लावण्यात आलेली आहे. सदरची नोटीस कोणताही मालकी असलेला आधार, कागदपत्रे, पुरावा संबंधित लोकांकडे नाही. तरीसुद्धा अद्यापपर्यंत सदरची नावे 8अ उतारा नोंद रजिस्टरला जिंवत असून सदरची असणारी नोंद माझे मालकी वहिवाटीची जागेत असून सदरची नोंद पुराव्यानिशी रद्द करण्यात येऊन संबंधितावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी व आपले कार्यालयीन कर्मचारी ग्रामसेवक यांचेवर सुद्धा कायदेशीर कारवाई करण्यात यावी. व सदर प्रकरण जलदगतीने हाताळून सदरची बेकायदेशीरपणे असणारी नोंद रद्द करण्यात यावी. असा तक्रारी अर्ज दि. 10/11/2025 गट विकास अधिकारी

(ग.श्रे.) पंचायत समिती शिरुर यं◌ाना मी दिला होता. मी दिलेल्या तक्रारी अर्जावरून गटविकास अधिकारी, शि
यांनी त्यांचेकडील संदर्भ जाक /वशि/ कवि/ पंचा-2/1961/2025 प्रमाणे दिंनाक 25/11/2025 रोजी सदर
प्रकरण जलदगतीने हाताळून बेकायदेशीरपणे असणारी नोंद रद्द करण्यात यावी असे संदर्भीय पत्रान्वये ग्रामपंचायत
अधिकारी कान्हुरमेसाई यांना पत्र दिले असून सदर नोंदीबाबत महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1959 अन्वये योग्य
ती नियमोचित कार्यवाही करून अहवाल माननीय कार्यालयास सादर करावा असे कळविले होते.
दिनाक 08/12/2025 रोजी 12.00 वाजणेचे सुमारास मी गट विकास अधीकारी यांनी दिलेल्या पत्रावर
ग्रामपंचायात कान्हुरमेसाई येथेल ग्रामसेवक श्री के.बी. घासले यांनी काय कार्यवाही केली आहे, याबाबत माहिती
मिळणेकामी माहिती अधिकार कायदा 2005 अन्वये अर्ज श्री के बी घासले यांना दिला. त्यावेळी मी माझ्या
कामाबाबत त्यांना विचारणा केली असता ते मला म्हणाले की, होईल. परंतु माझी खात्री आहे की यापुर्वी माझ्या
कामासाठी सहा ते सात वेळा त्यांना भेटलो होतो परंतु त्यांनी माझे काम आज पर्यन्त केलेले नाही. त्यांना भेटून मी
ग्रामपंचातय ऑफिस मधून बाहेर आलो.

त्यावेळेस नेहमी ग्रामपंचायतमध्ये हजर असणारे घंटागाडीवरील चालक भरत पोपट गायकवाड मला ग्रामंपचायतच्या
बाहेर भेटले. त्यावेळेस ते मला म्हणाले की, शिंदे तुम्ही मला न भेटता डायरेक्ट भाऊसाहेबांना भेटुन काही फायदा
होणार नाही. माझे व भाऊसाहेब बोलणे झाल्याशिवाय तुमचे काम होणार नाही. त्यावेळेस मी त्यं◌ाना म्हणालो की,
तुम्ही भाऊसाहेबानां सांगुन माझे काम करुन घ्या. त्यावेळेस गायकवाड मला म्हणाले की त्यासाठी पैसे लागतील.
त्यावेळेस मी त्यांना विचारले की, किती पैसे लागतील. त्यावेळेस ते मला म्हणाले माझे व भाऊसाहेबांचे मिळून 10
ते 15 हजार रुपये लागतील. त्यावेळेस मी त्यांना म्हणालो की, माझ्याकडे एवढे पैसे नाहीत पैसे जमा झाले की
तुम्हाला सांगतो त्यावेळेस गायकवाड मला ठीक आहे असे म्हणाले. गायकवाड यांनी माझ्याकडे मागणी केलेले 10 ते
15 हजार रूपये हि रक्कम कोणतीही शासकीय फि नसून लाच असल्याची माझी खात्री झाली आहे. मला त्यांना लाच
देण्याची इच्छा नाही. त्यामुळे त्यांचेवर आपले विभागाकडून योग्य ती कारवाई करावी ही विंनती आहे.
माझे व गायकवाड यांचे मध्ये कोणताही आर्थिक व्यवहार नाही. माझे शिक्षण बारावी पर्यंत झाले असून मला लिहीता
वाचता येते. सदरची तक्रार मी स्व:हस्ताक्षरात स्वइच्छेने लिहून दिली आहे. तरी माझ्या तक्रारीवर आपल्या
विभागाकडुन योग्य ती कायदेशीर करण्यात यावी." अशी तक्रार कथन केली. तक्रारदार यांचे तक्रारीवर दोन्ही पंचांनी
व आम्ही समक्ष म्हणुन सही केली. ती वेळ सायंकाळी 17.50 वा ची होती. त्यानंतर तक्रारदार यांनी दिलेल्या
तक्रारीच्या अनुषंगाने दिंनाक 10/12/2025 रोजी पडताळणी व सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठविण्यात
आले.

दिंनाक 09/12/2025 रोजी तक्रारदार, पंच व पथक यांना दिलेल्या सुचनाप्रमाणे दिंनाक 10/12/2025 रोजी
कान्हुरमेसाई, ता. शिरुर, जि.पुणे येथील चंद्रमा हॉटेल येथुन पुढील कारवाई करण्याचे ठरविल्याने◌े सापळा
कारवाईतील आम्ही पंच सर्व स्टाफ असे पडताळणी व सापळा कारवाई करीता लागणा-या सर्वसाहित्य सोबत घेवुन
शासकीय वाहन मारूती इर्टीगा एम.एच.12.युसी.4109 यावरील चालक नामे सहा.पो.फौज जाधव यांना बोलावुन
घेवुन त्यांना सापळा कारवाई पथकात सामील करून योग्य त्या सुचना दिल्या. नंतर सापळा कारावाईतील आम्ही,
पंच, सर्व स्टाफ असे सकाळी 08.40 वा ला.प्र.वि. कार्यालय पुणे येथुन रवाना होवुन कान्हुर मेसाई गावाचे पुर्वी
हॉटेल चंद्रमाचे अलीकडे सकाळी 10.40 वाजता पोहचलो असता तक्रारदार हे त्यांचेकडील वाहनासह तेथे
उपस्थित होते. नंतर तक्रारदार यांचेसह पाबळ-खेड रोडलगत एका निंजण ठिकाणी सापळा पथक, पंच व शासकीय
वाहनासह जावून थांबलो. त्यानंतर आम्ही पंचासमक्ष सोनी कंपनीचा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून व एक पॅकबंद
मायक्रो एस.डी.कार्ड चे पाकीट समक्ष हजर केले व त्याबाबची पंचाना माहीती देवुन मायक्रो एस.डी.कार्डचे सिलबंद
पॅकिंग उघडुन दाखविले असता ते EVM कंपनीचे 32 जी.बी. चे मायक्रो एस.डी.एच.सी. आय. कार्ड मेमरी कार्ड
त्याचेमागील बाजुस EETF32GMR0825 0032F5A55 K2523053063M असे लिहीलेले असे
असल्याचे दिसून आले. त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रीत नसल्याची आम्ही पंचाची व तक्रारदार यांची
खात्री करुन दिली. त्यानंतर सदरचे पडताळणी निवेदनाचे व्हिडीओ रेकॉडींग देखील केले जाणार असल्याचे आम्ही,
पंचांना व तक्रारदार यांना सांगितले त्याकरीता पो.कॉ./3037/विशाल माने यांचे वन प्लस मोबाईल हा मोबाईल
वापरण्याचे ठरविले. पो.कॉ.माने यांनी त्यांचे मोबाईलमध्ये एक नवीन EVM कंपनीचे 32 जी.बी. चे मायक्रो एस.डी.
एच.सी. आय. कार्ड मेमरी कार्ड त्याचे मागील बाजुस EETF32GMR0825 0032F5A55
W2517044242M असे लिहीलेले मेमरी कार्ड मोबाईलमध्ये बसविले.
त्यानंतर सदर शासकिय व्हाईस रेकॉर्डर पो.शि./1966/प्रविण तावरे यांचे मार्फत चालु करुन प्रथम तक्रारदार श्री.

चंद्रकांत अप्पाजी शिंदे यांचे त्यानंतर पंच नं. 1 श्री. अनिकेत बाळासाहेब पवार, व पंच क्र. 2 श्री. अनुप प्रताप जेधे यांचे पडताळणी कारवाईचे निवेदन 11.13 ते 11.21 वा.चे दरम्यान ध्वनिमुद्रीत केले निवेदन संपल्यानंतर व्हाईस रेकॉर्डर बंद केला, सदरचे निवेदन ध्वनिमुद्रीत करतेवेळी पो. शि.3037/ विशाल माने यांनी त्यांचे वन प्लस कंपनीचे मोबाईल फोनमध्ये व्हिडीओ चित्रीकरण केले आहे. त्यानंतर आम्ही सदरचे निवेदन शासकिय रेकॉर्डरमध्ये रेकॉर्डिंग झाले अगर कसे? याबाबत खात्री केली असता, सदरचे रेकॉर्डींग झाल्याचे दिसून आले. सदर घेतलेल्या निवेदनाच्या प्रतीवर आम्ही व पंचांनी सहया केल्या आहेत.

त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांचे शर्टच्या आतमध्ये डावे बाजुस बनियनला लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्रं 1 यांचेसह तक्रारदार यांचेकडील हिरो होन्डा पॅशन प्लस दुचाकी वाहन क्र.एमएच 12 जीबी 3647 वरुन रवाना केले ती वेळी 11.36 वा. ची होती.

त्यानंतर 12.15 वा.चे सुमा. तक्रारदार व पंच क्रं 1 पवार हे पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकार्डर बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 श्री अनिकेत पवार यांना पंच क्रं 2 यांचेसमक्ष पडताळणी कारवाईकरीता गेल्यापासुन परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, पंच क्र. 1 पवार यांनी सांगीतले की, "मी व तक्रारदार शिंदे असे तक्रारदार यांचे वाहन क्रं दुचाकी वाहन क्र.एमएच 12 जीबी 3647 यावरुन कान्हुर मेसाई ग्रामपंचायत कार्यालय येथे गेलो. तक्रारदार यांनी त्यांचे वाहन पार्क केले असता काही वेळातच एक इसम ग्रामपंचायत कार्यालयातुन बाहेर आला तो कान्हूर मेसाई ग्रामपंचायत मधील कर्मचारी घंटागाडीवरील चालक भरत गायकवाड असल्याचे तक्रारदार यांनी मला डोळ्याने इशारा करून दाखविले. घंटागाडी चालक आमचे जवळ आला त्यानंतर तक्रारदार व भरत गायकवाड तक्रारदार यांचे कामासंदर्भाने चर्चा सूरू झाली.

त्यानंतर भरत गायकवाड आम्हाला सदर ग्रामपंचायत कार्यालयाचे आतमध्ये ग्रामसेवक यांचेकडे घेवून गेले. सदर कक्षात एक इसम बसले होते तेच ग्रामविकास अधिकारी घासले असल्याचे तक्रारदार यांनी मला इशा-याने दाखविले त्यावेळी सदर कक्षात इतर लोक त्यांचे कामानिमित्ताने थांबलेले होते. तक्रारदार यांनी ग्रामसेवक घासले यांना त्यांचे कामाबाबत विचारणा केली असता ग्रामसेवक घासले यांनी तक्रारदार यांचे विरुध्द बाजूच्या लोकांना तीन दिवसापुर्वी त्यांचे म्हणणे सादर करण्याबाबत नोटीस दिली असून त्यांचे म्हणणे आल्यानंतर सोमवारी बघु असे तक्रारदार यांना सांगितले. त्यामुळे ग्रामसेवक घासले यांनी तक्रारदार यांचे विरुध्द बाजुचे लोकांना बजावलेल्या नोटीशीचे म्हणणे काय येते त्यावरून सोमवारी बघु असे सांगुन तक्रारदार यांना जाण्यास सांगितले. त्यामुळे तक्रारदार व मी सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो, अशी हकिकत पंच क्र.1 श्री पवार यांनी सांगितली. त्यानंतर तक्रारदार शिंदे यांना घडलेला घटनाक्रम विचारला असता त्यांली देखील पंच क्र.1 श्री पवार यांनी सांगितलेल्या हकिकतेप्रमाणे मिळती जुळती हकिकत सांगितली. त्याअनुशंगाने आम्ही पंचांना, तक्रारदार यांना व पथकास गोपनीयतेच्या सुचना देवून तक्रारदार यांना लाचेची मागणी झाल्यास सपर्क करण्यास सांगितले त्याबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

दिनाक 5/01/2026 रोजी यातील तक्रारदार श्री.चंद्रकांत अप्पाजी शिंदे यांचा आमच्या मोबाईल फोनवर हॉटसअप कॉलद्वारे फोन आला त्यांनी मला सांगितले की, ग्रामपंचायत कर्मचारी भरत पोपट गायकवाड याने माझ्याकडे पुन्हा 2000 रूपयांची पुन्हा मागणी लाचेची मागणी केलेली आहे व उदया दिनाक 06/01/2025 रोजी मला ग्रामपचांयत कार्यालय कान्हूर मेसाई येथे भेटायला बोलावले आहे. त्याअनुषंगाने आम्ही यापुर्वी पडताळणी कारवाईकामी असलेल्या दोन पंचाच्या कार्यालयास कळवून पंचाना दिनाक 6/01/2026 रोजी सकाळी 08.00 वा लाप्रवि, कार्यालय, पुणे येथे हजर ठेवणेबाबत निरोप दिला.

त्याप्रमाणे दिनाक 06/01/2026 रोजी नमूद कारवाईतील तक्रारदार, पंच व सापळा पथक सकाळी 08.00 वा. लाप्रवि कार्यालयात हजर झाले. पंचासमक्ष हजर असलेले तक्रारदार श्री चंद्रकांत शिंदे यांनी दिनाक 09/12/2025 रोजी दिलेल्या लाच मागणीचे तक्रारीच्या अनुषंगाने पुन्हा पडताळणी करुन नंतर सापळा कारवाई आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगितले व आम्ही, तक्रारदार इसम नामे श्री. चंद्रकांत अप्पाजी शिंदे, वय- 40 वर्षे, व्यवसाय- शेती, रा. कान्हुरमेसाई, ता. शिरुर, जि. पुणे, यांची व पडताळणी कारवाईतील अंमलदार म.सहा. फौज/श्रीगार, पो.कॉ./3037 विशाल माने व मपोकॉ/10768 पुजा डेरे व चालक सहा.फौजदार चव्हाण यांची ओळख करून दिली.

आम्ही दिनाक 10/12/2025 रोजी केलेल्या पडताळणी नंतर घडले घटनेबाबत तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष विचारले असता, तक्रारदार यांनी सांगितले की, दिनाक 09/12/2025 रोजी दिलेल्या लाच मागणीच्या तक्रारी वरून दिनाक 10/12/2025 रोजी पडताळणी पंचनामा करण्यात आल्यानंतर दिनाक 11/12/2025 रोजी त्यांचे प्रलंबित कामासाठी ग्रामपंचायत कान्हूरमेसाई येथील कर्मचारी भरत पोपट गायकवाड यांने त्यांचे मोबाईल फोनवर

फोन करून एक नवीन अर्ज देण्यास सांगितला व त्याचे मोबाईलवर 1500 रूपये ऑनलाईन पाठविण्यास सांगित त्यामुळे मी त्याचे मोबाईल नंबर 9975674662 वर माझे मोबाईल नंबर 9823631512 यावरून 1500 रू माझे काम होईल या आशेने माझी इच्छा नसताना पाठविले. मी त्यांना पाठविलेल्या 1500 रूपयाचे ऑनलाईन रिसीटचा त्याचा स्क्रिन शॉट मी काढून ठेवला आहे. तसेच सदरचा कॉल माझे मोबाईल मध्ये रेकॉर्ड झालेला आहे. माझ्या प्रलंबित कामासाठी ग्रामपंचायत कान्हूरमेसाई येथील घंटागाडी वरील चालक भरत पोपट गायकवाड यांनी मला दिनाक 5/01/2026 रोजी 2000 रूपयांची पुन्हा मागणी लाचेची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने आज दिनाक 06/01/2025 रोजी मला भरत गायकवाड यांनी भेटायला बोलावले आहे.

त्यानंतर आम्ही पडताळणी व सापळा करवाईकरीता लागणारे शासकीय लॅपटॉप, पिं्रटर, काळे पडदे, अॅन्थ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायलेट दिवा, लाख, सिल, दिनाक 10/12/2025 रोजी पडताळणी व रेकॉर्डिंग कामी वापरलेले सिलबद मेमरी कार्ड असलेले दोन मेमरी कार्ड लिफाफे, व्हाईस रेकॉर्डर, शासकीय हॅन्डीकॅम कॅमेरा, स्टेशनरी साहित्य व इतर साहित्याची तयारी केली व सदर चे साहित्य सोबत घेवुन शासकीय वाहन मारूती इर्टीगा एम.एच.12.युसी.4105 यावरील चालक नामे सहा.पो.फौज चव्हाण यांचेसह सर्व सापळा पथक असे 09.46 वा ला.प्र.वि. कार्यालय येथुन रवाना झालो. आम्ही रवाना होण्याचे आगोदर तक्रारदार हे त्यांचेकडील दुचाकी वाहन क्र. एमएच 12 जीबी 3647 हिचे वरून आमच्या पुढे रवाना झाले होते.

आम्ही कान्हुर मेसाई गावाचे अलीकडे इंडीयन ऑईल पंपाचे जवळ 11.48 वाजता पोहचलो असता त्याठिकाणी तक्रारदार हे त्यांना सकाळी दिलेल्या सुचनाप्रमाणे सदर ठिकाणी त्यांचेकडील हिरोहोन्डा पॅशन प्लस दुचाकी वाहन क्र.एमएच 12 जीबी 3647 सह हजर होते. त्यावेळी आम्ही सर्वजन ठिकाणी लोकांची वर्दळ नाही अशा एका निंजण ठिकाणी जावून थांबलो. ती वेळ 12.05 अशी होती.

त्यानंतर आम्ही दिनाक 10/12/2025 रोजी पडताळणी कामी वापरलेले मेमरी कार्ड सिंलबद लिफाफ्यातून बाहेर काढून मपोकॉ/10768 पुजा डेरे यांचे ताब्यात दिले. तसचे व्हाईस रेकॉर्डर देखील त्यांचे ताब्यात दिला. त्यानंतर मपोकॉ/10768 पुजा डेरे यांनी सदरचे मेमरी कार्ड व्हाईस रेकॉर्डर मध्ये बसविले. मपोकॉ/10768 पुजा डेरे यांनी सदरचा व्हाईस रेकॉर्डर चालु केला. दिंनाक 10/12/2025 रोजी पडताळणी झाल्यानंतर सदरचे व्हिडीओ रेकॉर्डींग मेमरी कार्ड ज्या लिफाफ्यामध्ये सिल बंद करून ठेवले होते त्या लिफाफ्यामधून बाहेर काढले व पो.कॉ. /3037/विशाल माने यांचे ताब्यात दिले. पो.कॉ./3037/विशाल माने यांनी सदरचे मेमरी कार्ड हे शासकीय रेकॉर्डींग कॅमे–यात बसविले.

त्यानंतर सदर शासकिय व्हाईस रेकॉर्डर मपोकॉ/10736 पुजा डेरे यांचे मार्फत चालु करुन प्रथम तक्रारदार श्री. चंद्रकांत अप्पाजी शिंदे यांचे त्यानंतर पंच नं. 1 श्री. अनिकेत बाळासाहेब पवार, व पंच क्र. 2 श्री. अनुप प्रताप जेधे यांचे पडताळणी कारवाईचे निवेदन 12.19 ते 12.26 वा.चे दरम्यान ध्वनिमुद्रीत केले निवेदन संपल्यानंतर व्हाईस रेकॉर्डर बंद केला, सदरचे निवेदन ध्वनिमुद्रीत करतेवेळी पो. शि.3037/ विशाल माने यांनी त्यांचे ताब्यातील शासकीय कॅमे–यामध्ये व्हिडीओ चित्रीकरण केले आहे. सदरचे निवेदन शासकिय रेकॉर्डरमध्ये रेकॉर्डिंग झाले अगर कसे? याबाबत खात्री केली असता, सदरचे रेकॉर्डींग झाल्याचे दिसून आले. सदर घेतलेल्या निवेदनाच्या प्रतीवर आम्ही व पंचांनी सहया केल्या ते सोबत जोडलेल्या प्रपत्र 2 प्रमाणे आहे.

त्यानंतर आमचे आदेशानुसार मपोकॉ/10768 पुजा डेरे यांनी सदरचा शासकिय व्हाईस रेकॉर्डर हा पो.कॉ./3037/ विशाल माने यांचे ताब्यात दिला. पो.कॉ./3037/विशाल माने यांनी शासकिय व्हाईस रेकॉर्डर हा पुन्हा 12.43 वाजता चालु करुन होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार यांचे शर्टच्या आतील बाजुस डावे हाताचे काखेत बनियनला कोणास दिसणार नाही अशारीतीने लावला. त्यानंतर तक्रारदार श्री चंद्रकांत अप्पाजी शिंदे व पंच क्रमांक 1 श्री. अनिकेत बाळासाहेब पवार, असे कान्हुर मेसाई ग्रामपंचायत कार्यालय येथे ग्रामसेवक घासले व घंटागाडी चालक गायकवाडयांची भेट घेण्याकरीता तक्रारदार यांचेकडील हिरोहोन्डा पॅशन प्लस दुचाकी वाहन क्र.एमएच 12 जीबी 3647 ने रवाना झाले.

त्यानंतर काही वेळाने दुपारी 13.09 वा सुमारास तक्रारदार श्री चंद्रकांत अप्पाजी शिंदे व पंच क्रमांक 1 श्री. अनिकेत बाळासाहेब पवार हे पडताळणी पथक थाबलेल्या ठिकाणी परत आले. तेव्हा आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर पो.कॉ./3037/विशाल माने यांचेकरवी काढून तो बंद करुन त्यांचेकडे घेतला. त्यानंतर तक्रारदार यांना पडताळणी कामी रवाना केलेपासुन ते परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारले असता, त्यांनी पंच क्र.2 श्री जेधे यांचे समक्ष सांगितले कि, मी व पंच क्रमांक 1 असे असे तक्रारदार यांचे दुचाकी वाहनाने कान्हुर मेसाई ग्रामपंचायत कार्यालय येथे निघालो असता विद्याधाम उच्चमाध्यमिक विद्यालय, कान्हूर मेसाई शाळेच्या गेट जवळच भरत गायकवाड यांची भेट झाली. त्यावेळेस तक्रारदार यांनी त्यांचे प्रलंबित कामाच्या अनुषंगाने चर्चा केली त्याबाबत चर्चा करीत असताना भरत गायकवाड तक्रारदार यांना म्हणाला की, मी तुला किती वेळा सांगितल होत तू दोन पाठव

म्हणलं तुला त्यावेळस तक्रारदार भरत गायकवाड याला म्हणाले की, किती? त्यावेळेस भरत गायकवाड तक्रारदार यांना म्हणाला की, पाठवलंच नाही त्वा काय... त्यावेळस तक्रारदार भरत गायकवाड याला म्हणाले की, कव्हा.. ? त्यावेळेस भरत गायकवाड तक्रारदार यांना म्हणाला की, परवाच्या दिवशी तुला सांगितल होत त्यावेळस तक्रारदार भरत गायकवाड याला म्हणाले की, ह. ह. त्यानंतर तक्रारदार व भरत गायकवाड यांचेत तक्रारदार यांचे कामच्या अनुषंगाने बोलणे सुरू होते त्यावेळेस तक्रारदार भरत गायकवाड याला म्हणाले की, नाही..पहिंल्यादा कसं होतं तुम्ही 10 ते 15 हजार मागितल. काय असेल ना ते बाबा एकदम केल, परत नंतर मग तुम्ही 10 12 तारखेला अर्ज द्यायला लावला. त्यावेळेस भरत गायकवाड तक्रारदार यांना म्हणाला की, विषय कसा असतो माहिती का.. त्यावेळस तक्रारदार भरत गायकवाड याला म्हणाले की, 12 तारखेला अर्ज दिला त्यावेळेस भरत गायकवाड तक्रारदार यांना म्हणाला की, माणसं असे असतात ना त्यावेळस तक्रारदार भरत गायकवाड याला म्हणाले की, सही साईन घेतली आपण त्यावेळेस भरत गायकवाड तक्रारदार यांना म्हणाला की, तोंडाला हाड नसत एक तर आपण यांना कसं दाना चारून चारून कुठेतरी घोड्यावर बसून गोष्ट करायला लागत आता हे तुलाही माहिती आहे बरं ते सांगा ते ऐका म्हणून.. तुला मी म्हणलं का 10 हजार दे 15 हजार दे असं म्हणलं तुला मी ते काय चाललंय फक्त हे खाण्या पिण्यावर चालले करू किरकोळ किरकोळ मधी आस.. त्यावेळस तक्रारदार भरत गायकवाड याला म्हणाले की, मग किती देऊ ? त्यावेळेस भरत गायकवाड तक्रारदार यांना म्हणाला की, असा विषय तुला मी ते म्हटल होत 2 हजार सोड.. म्हटल होत... त्यावेळस तक्रारदार भरत गायकवाड याला म्हणाले की, 2 हजार.. बर ठीक ये.. त्यावेळेस भरत गायकवाड तक्रारदार यांना म्हणाला की, पण काय होतं आता एका टायमा बसले काय 15 ते 16 शे रुपयेला घोडा लावेल बिन कामाचा त्यावेळेस भरत गायकवाड व तक्रारदार यांच्यात चर्चा चालू असताना तक्रारदार भरत गायकवाड याला म्हणाले की, भाऊ साहेबांशी बोलणे करून दे म्हणून त्याने भाऊ साहेबां त्याचे मोबाईल फोन वरून स्पीकर फोन ऑन करून गायकवाड यांने भाउसाहेबांशी बोलणे केले असता गायकवाड भाऊसाहेबांना म्हणाला की, उद्या कन्फर्म आहे का. तुम्ही इकडं ते काय आहे ते शिंदेच प्रकरण आहे ना ते मारते चक्रा.. त्यांचा रिपोर्ट सादर करून जाऊ द्या पुढं आपल्या डोक्यात तान कमी होऊन जाईल तो.... तेवढं ते उद्या आल का तेवढं ते रिपोर्ट लिहून जाऊ द्या पुढं ते साहेबां पुढं.. नाही काय.. आपल्या डोक्यात ताण कमी होणार.. नाही म्हणजे काय सारखं सारखं त्यांना चकरा मारायच्या त्यांना.. आपण दुसर ही करायच ग्रामसेवक घासले गायकवाडला म्हणाले की, ह..म ह..म ठीक आहे... गायकवाड हा ग्रामसेवक यांना म्हणाला की, चालल उद्या आहे ना मग 11 वाजेपर्यंत उद्या ठीक.. ठीक चालते... त्यांचे बोलणे झाल्यानंतर तक्रारदार भरत गायकवाड याला म्हणाले की, बर किती करावे लागेल.. बघा 12 तारखेला अर्ज दिला तुम्ही म्हणले अर्ज द्या.. अर्ज दिला भाऊसाहेबांची साईन घेतली त्याच्यावर सही घेतलाय त्यानंतर तक्रारदार व भरत गायकवाड यांचेत त्यांचे कामाच्या बोलणे चालू असताना त्यावेळेस भरत गायकवाड तक्रारदार यांना म्हणाला की, आज तु सोडुन ठेव ते उदया आल्याबरोबर भाऊसायबांना सांगतो, तु आपला आला की भाऊसाहेबांना बोलुन घे तुझं म्हणणं, मी कॅबीनमध्ये आल्यावर मी साहेबांशी बोलुन घेतो आता जो विषय आहे तसा.. भरत गायकवाड याचे बरोबर असे बोलणे झाल्यानंतर तक्रारदार परत आले अशी हकीगत सांगितली. त्यानंतर पंच क्रमांक 1 यांना घडलेला घटनाक्रम विचारला असता त्यांनी देखील तक्रारदार यांनी सांगितलेल्या हकिकतेप्रमाणे मिळती जुळती हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण पडताळणी पथकातील पो.हवा. विशाल माने यांचे मदतीने त्यांचे संगणकावर कॉपी करुन घेऊन त्यामधील फाईल क्र.5 मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण फास्ट फॉरवर्ड करून आम्हा पंचा समक्ष ऐकुन ते पंच क्र.1 व तक्रारदार यांनी सांगितलेल्या हकिकतेप्रमाणे बरोबर असल्याची खात्री केली.

एकंदरीत नमुद पडताळणी कारवाईदरम्यान तक्रारदार यांची पंच क्र. 1 यांचे समक्ष उपस्थितीत कान्हूर मेसाई ग्रामपंचायतच्या घंटागाडी वरील चालक भरत गायकवाड त्यांचेत तक्रारदार यांचे प्रलंबित कामा संदर्भाने चर्चा झाली. त्यावेळी भरत गायकवाड याने तक्रादार यांचेकडे 2000 रूपयाची लाच मागणी केल्याचे व ग्रामसेवक यांचे सोबत दिनाक 7/01/2026 रोजी तक्रारदार यांचे प्रलंबित कामाच्या अनुषंगाने त्यांचे सोबत बोलणी करून देतो असे सांगितले असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे ग्रामसेवक घासले हे तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत दिंनाक 7/01/2026 रोजी पुढील पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही पंचाना व सापळा पथकातील स्टाफ असे सर्वांना गोपनियतेच्या सुचना देवून दिंनाक 7/01/2026 रोजी सकाळी 09.00 वा लाप्रवि कार्यालयात हजर राहण्याच्या व तक्रारदार यांना सकाळी 11.00 वा. कान्हूर मेसाई गावाचे जवळील इंडीयन ऑईल पंपाजवळ हजर राहणेबाबत सुचना दिल्या व दिंनाक 06/01/2026 रोजीची पडताळणी कार्यवाही तात्पुरती स्थगित करण्यात आली. आम्ही सापळा पथकासह सदर ठिकाणावरून शासकीय वाहनाने 13.50 वाजता रवाना होवनू 16.50 वाजता ला.प्र.वि. पुणे कार्यालयात पोहचलो. संपुर्ण घटनेचा सविस्तर पंचनामा करण्यात आला.

दिनांक 7/01/2026 रोजी सकाळी 11.00 वाजण्याचे सुमारास आम्ही सापळा पथक कान्हूर मेसाई गावाचे
जवळील इंडीयन ऑईल पंपाजवळ पोहचलो तक्रारदार सदर ठिकाणी आगोदर हजर होते. नमूद दिवशी ग्रामसेवक
घासले हे ग्रामपंचायत कार्यालयात आले नाहीत त्यामुळे पडताळणी कारवाई करणे शक्य झाले नाही. त्यावेळेस
आम्ही तक्रारदार यांना ज्यादिवशी ग्रामसेवक घासले हे ग्रामपंचायत कार्यालयात येतील त्यावेळेस आम्हाला मोबाईल
फोन करण्यास सांगून सदर ठिकाणावरून 17.30 वा रवाना होवून रात्री 20.00 वाजण्याचे सुमारास लाप्रवि, पुणे
कार्यालयात पोहचलो.

दिनाक 12/01/2026 रोजी तक्रारदार यांनी ग्रामविकास अधिकारी, घासले हे त्यांचे कार्यालयात हजर असल्याचे
आम्हाला मोबाईल फोन वरून कळविल्याने त्यांचे विरुध्द पडताळणी कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.
त्याप्रमाणे पडताळणी व सापळा करवाई करीता लागणारे शासकीय लॅपटॉप, पिं◌रटर, काळे पडदे, अ◌ॅन्थ्रासिन
पावडर, अल्ट्राव्हायलेट दिवा, लाख, सिल, मेमरी कार्ड, व्हाईस रेकॉर्डर, व्हिडीओ रेकॉर्डर, स्टेशनरी साहित्य व
इतर साहित्याची तयारी केली व सदरचे साहित्य सोबत घेवुन चालक सहा.पो.फौज अविनाश चव्हाण यांचे ताब्यातील
शासकीय वाहन मारूती इटींगा एम.एच.12.युसी.4109 याने सापळा कारावईतील आम्ही पंच, सर्व स्टाफ असे
12.30 वा ला.प्र.वि. कार्यालय येथुन कान्हूर मेसाई गावाकडे जाण्यास रवाना झालो. आम्ही कान्हुर मेसाई गावाचे
पुर्वी असलेल्या इंडियन ऑईल पेट्रोल पंपाचे जवळ 14.15 वाजता पोहचलो. सदर ठिकाणी तक्रारदार हे
त्यांचेकडील हिरोहोन्डा पॅशन प्लस दुचाकी वाहन क्र.एमएच 12 जीबी 3647 सह हजर होते. त्यावेळी आम्ही
सर्वजण ग्रामपंचायत कार्यालयाचे पाठीमागील बाजुस असलेल्या रस्त्याने पुढे संविदने रस्त्यालगत एका र्निजण
ठिकाणी जावून थांबलो. सदर ठिकाणावरून पडताळणी कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. पडताळणी
पथकातील नव्याने समाविष्ठ झालेल्या अंमलदारांची पुन्हा ओळख करून दिली.
त्यानंतर आम्ही पडताळणी पथकातील, पो.शि.1966 तावरे यांचे मदतीने सोबत जवळ असलेला सोनी कंपनीचा
शासकिय व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढून त्यामध्ये दि.06/01/2026 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान वापलेले
सिंलबद लिफाफ्यातील मेमरी कार्ड बाहेर काढले व ते शासकीय व्हाईस रेकॉर्डरमध्ये घातले. तसेच दि.
06/01/2026 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान व्हिडीओ चित्रिकरण करण्याकरीता वापलेले सिंलबद
लिफाफ्यातील मेमरीकार्ड बाहेर काढले व व्हिडीओ रेकॉर्डर मध्ये घातले व  नंतर सदर व्हिडीओ रेकॉर्डर पोशि
विशाल माने यांचेकडे दिला.

त्यानंतर सदर शासकिय व्हाईस रेकॉर्डर पो.शि./1966/प्रविण तावरे यांचे मार्फत चालु करुन प्रथम तक्रारदार श्री.
चंद्रकांत अप्पाजी शिंदे यांचे त्यानंतर पंच नं. 1 श्री. अनिकेत बाळासाहेब पवार, व पंच क्र. 2 श्री. अनुप प्रताप जेधे
यांचे पडताळणी कारवाईचे निवेदन 14.53 ते 15.00 वा.चे दरम्यान ध्वनिमुद्रीत केले निवेदन संपल्यानंतर व्हाईस
रेकॉर्डर बंद केला, सदरचे निवेदन ध्वनिमुद्रीत करतेवेळी पो. शि.3037/ विशाल माने यांनी त्यांचेकडील शासकीय
व्हिडीओ रेकॉर्डमध्ये व्हिडीओ चित्रीकरण केले आहे. त्यानंतर आम्ही सदरचे निवेदन शासकिय रेकॉर्डरमध्ये रेकॉर्डिंग
झाले अगर कसे? याबाबत खात्री केली असता, सदरचे रेकॉर्डीग झाल्याचे दिसून आले. सदर घेतलेल्या निवेदनाच्या
प्रतीवर आम्ही  व पंचांनी सहया केल्या आहेत.

त्यानंतर आम्ही पो.शि./1966/प्रविण तावरे यांचे मार्फतीने व्हाईस रेकॉर्डर हा पुन्हा 15.12 वाजता चालु करुन
होल्ड मोडवर ठेवून तो कोणास दिसणार नाही अशारितीने तक्रारदार यांना लावला. त्यानंतर तक्रारदार श्री चंद्रकांत
अप्पाजी शिंदे व पंच क्रमांक 1 श्री. अनिकेत बाळासाहेब पवार, असे कान्हुर मेसाई ग्रामपंचायत कार्यालय येथे
ग्रामसेवक घासले यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार यांचेकडील हिरोहोन्डा पॅशन प्लस दुचाकी वाहन क्र.एमएच 12
जीबी 3647 ने रवाना झाले. त्यावेळी आम्ही, सापळा पथक व पंच क्रमांक 02 असे सदर ठिकाणी शासकीय
वाहनामध्ये थांबून राहीलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री चंद्रकांत अप्पाजी शिंदे व पंच क्रमांक 1 श्री. अनिकेत बाळासाहेब पवार हे
पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. तेव्हा आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर पो.शि.
/1966/प्रविण तावरे यांचेकरवी काढून तो बंद करुन आमच्याकडे घेतला. ती वेळ 16.32 वाजताची होती.
त्यानंतर आम्ही पंच क्र.1 श्री. अनिकेत बाळासाहेब पवार यांना पडताळणी कामी रवाना केलेपासुन ते परत येईपर्यंत
घडलेल्या घटनेबाबत विचारले असता, त्यांनी पंच क्र.2 श्री जेधे यांचे समक्ष सांगितले कि, मी व तक्रारदार असे
तक्रारदार यांचे दुचाकी वाहनाने कान्हुर मेसाई ग्रामपंचायत कार्यालयाचे आवारात पोहचून तक्रारदार यांनी त्यांचे
वाहन पार्क केले. काही वेळ थांबल्यानंतर घंटागाडीवरील चालक भरत गायकवाड हे न दिसल्याने तक्रारदार यांनी
त्यांना स्पीकर ऑन करून फोन केला असता भरत गायकवाड यांचे पत्नीने फोन उचलला त्यावेळी तक्रारदार यांनी
भरत गायकवाड यांचेबाबत विचारणा केली असता पत्नीने फोन भरत गायकवाड यांचेकडे दिला. त्यावेळी तक्रारदार
यांनी ते ग्रामपंचायत कार्यालय येथे ग्रामसेवक यांना भेटण्यास आल्याचे सांगितले असता भरत गायकवाड यांनी ते

जेवण करीत असून ते येईपर्यंत ग्रामसेवक यांची भेट घेवू नका व कोणाशी काही बोलू नका असे तक्रारदार यांना सांगितले. त्यानंतर आम्ही त्यांची काही काळ वाट पाहिली परंतु घंटागाडीवरील चालक भरत गायकवाड न आल्याने तक्रारदार यांनी त्यांना पुन्हा स्पीकर ऑन करून फोन केला असता त्यांनी थोडयाच वेळात आलो असे सांगितले. त्यानंतर पुढील थोडयाच वेळात चालक भरत गायकवाड हे ग्रामपंचातय कार्यालयाचे आवारात आम्ही थांबलेल्या ठिकाणी आले व आमच्याकडे पाहून काहीही न बोलता ग्रामसेवक घासले यांचे कार्यालयात गेले. लगेच बाहेर येवून त्यांनी ग्रामसेवक भाऊसाहेब जेवण करत असल्याचे सांगुन तुम्ही थोडावेळ बाहेर थांबा असे आम्हाला सांगितले त्याप्रमाणे आम्ही थांबून राहिलो. त्यानंतर चालक भरत गायकवाड ग्रामसेवक घासले यांचे कक्षात गेले आम्ही देखील त्यांचे कक्षात गेलो असता ग्रामसेवक यांचे कक्षात काही लोक बसलेले होते. त्यावेळी चालक गायकवाड हे ग्रामसेवक यांचे कक्षात थांबून राहिले व आम्ही थोडा वेळ वाट पाहिली. ग्रामसेवक यांचे कक्षातील लोक बाहेर गेल्यानंतर आम्ही ग्रामसेवक यांचे कक्षात गेलो असता ग्रामसेवक घासले त्यांचे खुर्चीवर बसले होते व चालक गायकवाड त्यांचे बाजुला उभे होते. त्यावेळी तक्रारदार लोकसेवक घासले यांना "नमस्कार सर" असे बोलले असता लोकसेवक घासले तक्रारदार यांना "बोलाना" त्यावर तक्रारदार यांनी "आपला रिपोर्ट पाठवायच काय झाल बिडीओचा" अशी विचारणा केली असता लोकसेवक घासले यांनी "आता कच्चा रिपोर्ट तयार केला पाठवयाचा राहिला 5, 6 दिवस बाहेरची काम होती" असे सांगितले असता तक्रारदार यांनी "भरत संग बोलो होतो मी" (लाचेच्या रकमेसंदर्भात) सांगितले असता त्यावर लोकसेवक यांनी "त्याच्या विषयी सारखं दररोज काय ना काही असते. त्याच्यामुळं त्याच्याकड फार जायच पण नाही, अण त्याला काही बोलायचं नाही, तुमचं काम मी बरोबर सादर करून देईल काही प्रॉब्लेम नाही" असे तक्रारदार यांना सांगितले. त्यावर तक्रारदार लोकसेवक यांना "काय होतय मला नाय टाईम...कंपनीत जायच यायच चक्कर मारायची.. काय असेल तर आपली बोलले होते आपल तुम्ही" असे बोलले असता लोकसेवक यांनी "नाय पैशाचे नाय काम करत आपण... विषय असता कितीतरी तुमच्या गावात कमवले असते पण त्याला काही अडचण नाही. पैशाला किंमत नसते.. होऊन जाईल काही प्रॉब्लेम नाय... नाही नका टेशन घेवु" तक्रारदार यांना असे सांगितले त्यावर तक्रारदार यांनी "रिपोर्टला आता किती दिवस लागतील" असे विचारले असता लोकसेवक यांनी "दोन-तीन दिवस लागतील" असे सांगितले असता त्यानंतर तक्रारदार, लोकसेवक व चालक गायकवाड यांचेत आणखी चर्चा झाली व त्यानंतर तक्रारदार व मी असे आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो. अशी हकिकत आम्हा पंचांपैकी पंच क्र.1 श्री पवार यांनी सांगितली. शासकीय व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण फास्ट फॉरवर्ड करून पंचा समक्ष ऐकले असता ते पंच क्र.1 व तक्रारदार यांनी सांगितलेल्या हकिकतेप्रमाणे बरोबर असल्याची खात्री केली.

एकंदरीत नमुद पडताळणी कारवाईदरम्यान तक्रारदार हे पंच क्र. 1 यांच्यासह कान्हुर मेसाई ग्रामपंचायत कार्यालयात गेले असता त्यांनी घंटागाडी चालक भरत गायकवाड यांचेसह ग्रामसेवक श्री घासले यांची भेट घेतली व कामासंदर्भाने चर्चा केली असता ग्रामसेवक घासले यांनी तुमचा अहवाल पुढील तीन दिवसात बीडीओ साहेबांना पाठवितो. तुम्ही घंटागाडी चालक भरत गायकवाड यांना संपर्क करू नका असे सांगितले परंतु तक्रारदार यांचेकडे त्यांचे तक्रारीचे अनुषंगाने लाच मागणी केली नसल्याचे निष्पन्न झाले. म्हणून पुढील तीन दिवसामध्ये ग्रामसेवक घासले यांनी तक्रारदार यांचे अतिक्रमण जागेचा अहवाल बीडीओ शिरूर यांना पाठविताना किंवा पाठविलेनंतर लोकसेवक ग्रामसेवक घासले यांचेकडून तक्रारदार यांचेकडे केलेल्या लाचमागणीवरून त्यांचेविरुध्द पुढील सापळा कारवाई आजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानुसार आम्ही उपस्थित सर्वांना आतापावेतो झालेल्या कार्यवाहीबाबत गोपनियता राखण्याच्या सुचना देवून दिंनाक 12/01/2026 रोजीची पडताळणी कार्यवाही स्थगित केली. सदर ठिकाणी पुढील कामकाज करणे सोईचे नसल्याने पुढील कामकाज ला.प्र.वि. पुणे येथे जावून करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यावेळी तक्रारदार हे त्यांचे दुचाकीने त्यांचे निवासस्थानी रवाना झाले व आम्ही,पंच व सापळा पथक असे सदर ठिकाणावरून शासकीय वाहनाने 18.10 वाजता रवाना होवनू 19.55 वाजता ला.प्र.वि. पुणे कार्यालयात पोहचलो. त्याठिकाणी घटनेचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

दिंनाक 25/02/2026 रोजी तक्रारदार यांनी आम्हाला फोन करून सांगितले की, त्यांचेकडे ज्या प्रलंबित कामाच्या अनुषंगाने ग्रामपचं◌ायत घंटागाडीवरील चालक भरत गायकवाड यांनी लाचेची मागणी केली होती तो अहवाल ग्रामसेवक घासले यांनी बीडीओ, शिरूर यांना पाठवला आहे. तक्रारदार यांचे ज्या कामाकरीता लाच मागणी झाली होती ते काम पुर्ण झाले असल्याने आत्ता ग्रामसेवक घासले व ग्रामपचं◌ायत घंटागाडीवरील चालक भरत पोपट गायकवाड यांचेकडून लाचेची मागणी होणार नाही किंवा ते दोघेही लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत.

तरी दिंनाक 09/12/2025 रोजी तक्रारदार श्री.चंद्रकांत अप्पाजी शिंदे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिंनाक 6/01/2026 रोजी 12.19 ते 13.09 वाजण्याचे दरम्यान विद्याधाम उच्चमाध्यमिक विद्यालय, कान्हूर मेसाई शाळेच्या गेट जवळच करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी

कारवाईमध्ये, तक्रारदार यांनी दिंनाक 10/11/2025 रोजी गट विकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती शिरूर यांना दिलेल्या अर्जावरून गट विकास अधिकारी, शिरूर यांनी त्याचेकडील संदर्भ जाक्र /वशि/ कवि/ पंचा-2/1961/2025 दिनाक 25/11/2025 रोजी प्रमाणे ग्रामपंचायत अधिकारी, कान्हूर मेसाई, ग्रामपंचायत यानां पाठविलेल्या पत्राचा अहवाल ग्रामसेवक यांचेकडून तयार करून तो गट विकास अधिकारी, शिरूर यांना पाठविण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे ग्रामपंचायत कान्हूर मेसाई, ता.शिरूर मधील कर्मचारी घंटागाडीवरील चालक नामे भरत पोपट गायकवाड याने स्वत:साठी व ग्रामसेवक श्री के बी घासले यांचेसाठी 2000 रूपयांची लाचेची मागणी केली म्हणुन माझी कान्हूरमेसाई ग्रामपंचायत कर्मचारी, भरत पोपट गायकवाड, रा.कान्हुरमेसाई ता.शिरूर जि. पुणे यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 (अ) प्रमाणे कायदेशिर फिंयाद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद** केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** DIPRATAN Gorakh GAIKWAD(I (Inspector)) / PBMH89816

**Rank (पद):** **or (किंवा)**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) No.(क्र.):**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
शिक्रापूर पोलीस स्टेशन
पुणे ग्रामीण

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** DIPRATAN Gorakh G
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PBMH89816